संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक
माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे
मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६
www.mandeshexpress.com




● वर्ष : ७ वे ● ● अंक : १०२ वा ● ● गुरुवार दि. २२ फेब्रुवारी २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

## तडवळेजवळ झालेल्या अपघातामध्ये युवकाचा जागीच मृत्यू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**आटपाडी/प्रतिनिधी :** आटपाडी तालुक्यातील तडवळे येथे झालेल्या अपघातामध्ये युवकाचा जागीच मृत्यू झाला. तर एक गंभीर जखमी आहे. किरण शंकर जगताप रा. माळेवाडी असे मयत युवकाचे नाव आहे. तर सतिश श्रीमंत शिंदे जखमीचे नाव आहे.
याबाबत घटनास्थळावरून मिळालेली माहिती अशी, माळेवाडी येथील किरण शंकर जगताप हे आटपाडीहून करगणी कडे इरटीगा (एम.एच.१० सीए ०२३०) या गाडीने निघाले होते. तर करगणीहून आटपाडीकडे आयशर टेम्पो (एम.एच.१० एडब्ल्यू २२५७) हा निघाला होता. तडवळे गावानजीक दोन्ही गाड्या आल्या असता. या दोन्ही गाड्यांचा समोर-समोर अपघात झाला. अपघाता नंतर गावातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरु केले होते. या भीषण अपघातामध्ये इरटीगा गाडी मधील किरण शंकर जगताप याचे जागीच निधन झाले. तर सतिश श्रीमंत शिंदे हा गंभीर जखमी झाला. या अपघातामध्ये दोन्ही गाड्यांचे प्रचंड मोठे नुकसान झाले असून सदर अपघाताची नोंद आटपाडी पोलीस ठाणे येथे झाली आहे किंवा नाही याबाबत माहिती समजली नाही. सदरचा अपघात हा दिनांक २० रोजी रात्री ८.३० च्या दरम्यान झाला.



अपघातामधील अपघातग्रस्त वाहने

## कुपवाडमध्ये ३०० कोटींचा एमडीचा साठा जप्त, तिघे ताब्यात

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**सांगली :** पुणे व सांगली पोलिसांच्या संयुक्त कारवाईमध्ये कुपवाडमध्ये १४० किलो मेफेड्रॉन (एमडी) या घातक अमली पदार्थाचा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी तिघांना ताब्यात घेण्यात आल्याची माहिती पुणे गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांनी बुधवारी दिली. पुणे पोलीसांनी पुणे व दिल्लीमध्ये छापे टाकून कोट्यावधींचा अंमली पदार्थांचा साठा जप्त केला. या ठिकाणी मिळालेल्या माहितीनुसार या अंमली पदार्थांचे धागेदोरे कुपवाडपर्यंत असल्याची माहिती पुणे पोलीसांना मिळाली.



बुधवारी दुपारपासून पुणे पोलीसांनी सांगली पोलीसांच्या मदतीने कुपवाडमधील स्वामी मळा, बाळकृष्ण नगर आणि दत्तनगर या तीन ठिकाणी १४० किलो एमडी हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. आंतरराष्ट्रीय बाजारात याचे मूल्य २८० ते ३०० कोटी रुपये आहे. पुण्याहून मिठाच्या गोणीतून हा माल कुपवाडला आल्याची माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे पुणे व सांगली पोलीसांनी संयुक्त कारवाई करुन घातक एमडी अमली पदार्थ जप्त करुन तिघांना ताब्यात घेतले असल्याचे सांगितले.

## नेलकरंजी शाखा अपहारप्रकरणी चौकशी समिती स्थापन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**सांगली :** सांगली जिल्हा मध्यवती सहकारी बँकेच्या नेलकरंजी शाखेतील ४८ लाखांच्या अपहारप्रकरणी वरिष्ठ अधिकारी विक्रम लाड यांच्या अध्यक्षतेखाली तिघांची चौकशी समिती नेमली आहे. शाखेसह सबंधित कर्मचार्यांनी यापूर्वी ज्या शाखांत सेवा बजावली आहे, त्या शाखातील कारभाराची चौकशी करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकारी शिवाजीराव वाघ यांनी दिले आहेत.
जिल्हा बँकेच्या नेलकरंजी शाखेत शाखाधिकारी आणि लिपिकाने ४८ लाखांचा अपहार प्रकार उघडकीस आला आहे. शाखाधिकारी म्हारगुडे आणि लिपिक प्रतीक पवार यांच्यावर बँकेने मंगळवारी निलंबनाची कारवाई केली. याप्रकरणी अधिक चौकशीसाठी प्रशासनाने समिती नियुक्त केली. अपहाराच्या रकमेत वाढ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. संबंधितांनी कमी वापरात असलेल्या खात्यावरील ठेवी मोडल्याचे तसेच बँकेच्या मासिक व्याजातील रकमेचा अपहार केल्याची माहिती प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाली आहे.
आटपाडी तालुक्यातील जिल्हा बँकेच्या नेलकरंजी शाखेत मासिक व्याजाच्या रकमेत तफावत असल्याने शाखेचे अंतर्गत तपासणी केली. त्या तपासणीमध्ये संबंधित शाखाधिकारी म्हारगुडे व लिपिक पवार यांनी दोघांनी संगनमताने अपहार केल्याचे उघडकीस आले आहे. जी खाती कमी वापराची आहेत, त्या खात्यावर जादाचे व्याज जमा करून त्यासाठी पैसे परस्पर काढल्याप्रकाराची सविस्तर चौकशी केली जाईल. याप्रकरणी अंतिम अहवाल प्राप्त होताच दोषी कर्मचार्यांवर फौजदारी करण्यात येणार असल्याचे वाघ यांनी सांगितले.

## मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात तडवळे शाळेचा तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**आटपाडी/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजने अंतर्गत ' मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या अभियानामध्ये जिल्हा परिषद शाळा तडवळे या शाळेने आटपाडी तालुक्यामध्ये दुसरा क्रमांक मिळवला आहे. आमची जिल्हा परिषद शाळा तडवळे ही इयत्ता पहिली ते सातवी पर्यंतची शाळा असून या शाळेने क्रीडा स्पर्धेमध्ये व विविध शालेय स्पर्धेमध्ये उत्तुंग यश संपादन केले आहे.
या शैक्षणिक वर्षांमध्ये नव्याने सुरू झालेल्या 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' या अभियानामध्ये राज्यातील सर्वच शाळा सहभागी झाल्या होत्या. या अभियानामध्ये शाळेची केंद्रस्तरीय व तालुकास्तरीय १०० गुणांची विविध पथकाकडून तपासणी केली. या तपासणीमध्ये वर्ग सजावट शालेय परिसर, शालेय इमारत व परिसराची स्वच्छता, वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, भौतिक सुविधा, क्रीडा स्पर्धेतील यश, विविध शालेय स्पर्धेतील यश, आरोग्य, राष्ट्रीय एकात्मतेसाठी राबवलेले विविध उपक्रम, आर्थिक साक्षरता व कौशल्य विकास यासाठी राबवलेले उपक्रम, लोक सहभाग, तंबाखू मुक्त शाळा व प्लास्टिक मुक्त शाळा यासाठी राबवलेले उपक्रम, माजी विद्यार्थी, पालक, स्थानिक सेवाभावी संस्था यांचा शैक्षणिक देणगीतील सहभाग या मुद्द्यांच्या आधारे मूल्यांकन केले. या सर्वच मुद्द्यांमध्ये आमच्या शाळेने अव्वल स्थान पटकावले आहे.
खानापूर तालुक्यातून मूल्यांकनासाठी आलेल्या तालुकास्तरीय मूल्यांकन कमिटीने वरील मुद्द्यांच्या आधारे शाळेची तपासणी केली.
या सर्व अभियानासाठी शेटफळे केंद्राचे केंद्रप्रमुख व शाळेचे मुख्याध्यापक जगन्नाथ जाधव, उपशिक्षक विजयकुमार गिड्डे, रूपाली चांडवले, स्वाती गिड्डे, मेघाराणी महामुनी या सर्वांचे गटशिक्षण अधिकारी दत्तात्रय मोरे व मयूर लाडे तसेच शिक्षण विस्तार अधिकारी अशोक म्हेत्रे, जगन्नाथ कोळपे, सुरेश हसबे यांनी अभिनंदन केले. या सर्व अभियानासाठी शाळेला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाळासाहेब गिड्डे व सर्व सदस्य तसेच सर्व पालक व तडवळे गावचे सरपंच उपसरपंच, सदस्य व सर्व ग्रामस्थ यांचे सहकार्य लाभले.



**आटपाडी : तडवळे : मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात तडवळे शाळेचा तालुकास्तरावर द्वितीय क्रमांक आल्याबद्दल केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक जगन्नाथ जाधव यांचा सत्कार करताना उपस्थित शिक्षक**




## २४ फेब्रुवारीपासून राज्यभर रास्तारोको : मनोज जरांगे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**जालना :** राज्य सरकारने ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला स्वतंत्र १० टक्के आरक्षण दिले. विधिमंडळात विशेष अधिवेशनात मंगळवारी हा कायदा कोणत्याही चर्चेविना एकमताने मंजूर करण्यात आला. दरम्यान, मनोज जरांगे पाटलांनी या विधेयकावर आक्षेप नोंदवून सगेसोयरे तरतुदीवर ठाम भूमिका घेतली आहे. त्यामुळे आता त्यांनी आंदोलनची पुढची भूमिका स्पष्ट केली.
मनोज जरांगे पाटलांनी सरकारला २३ फेब्रुवारीपर्यंत अल्टिमेटम दिला आहे. त्यानुसार, सरकारने सगसोयऱ्यांसदर्भात कायदा केला नाही तर २४ फेब्रुवारीपासून राज्यभर आंदोलन करण्यात येणार आहे. त्यासाठी राज्यभरातील मराठा बांधवांना आंदोलनाची दिशा स्पष्ट केली आहे. २४ फेब्रुवारीपासून प्रत्येक गावात, शहरात सकाळी साडेदहा वाजल्यापासून दुपारी १ वाजेपर्यंत आंदोलन करायचं आहे. या काळात प्रत्येकाने आपल्या गावात रास्ता रोको करायचा आहे, असं आवाहन मनोज जरांगेंनी मराठा बांधवांना केलं. ज्यांना सकाळच्या वेळी आंदोलन करता येणार नाही, त्यांनी सायंकाळी चार ते रात्री ७ वाजेपर्यंत आंदोलन करायचं आहे, असं मनोज जरांगे म्हणाले. तसंच, या काळात शांततेत आंदोलन करायचे आहे. जाळपोळ किंवा कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, याची काळजी घेऊन आंदोलन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.
२२ आणि २३ ला आंदोलनाचं निवेदन द्या. हे निवेदन कायम स्वरुपाचं आहे. आपल्याला असं आंदोलन सुरू करायचं आहे की आपण आपलं गाव सांभाळायचं. कोणीही तालुक्याला किंवा जिल्ह्याला यायचं नाही. आपल्या गोर गरीब मराठ्याचा पैसा वाचेल. पूर्ण गाव आंदोलनात उभं राहिल्याने शक्ती वाढेल. गावात असल्याने घराला कुलूप लावून आंदोलनाच्या केंद्रावर येऊ शकतो आणि मागेही जाऊ शकतो. आपल्याला आंदोलन यांना जेरीस आणण्यासाठी करायचं आहे. माझा किंवा कोणाचाही हट्ट पूर्ण करण्यासाठी आंदोलन करायचं नाही. महाराष्ट्रभर प्रत्येकाने आपल्या गावात आंदोलन करायचं आहे. प्रत्येकाने रास्ता रोको करायचा आहे. हे आदर्श रास्ता रोको आंदोलन असणार आहे. जाळपोळ वगैरे काही नाही, असं जरांगे पाटील म्हणाले.
दरम्यान, २४ तारखेपासून आपल्या गावात-शहरांत रास्ता रोको केल्यानंतर ३ मार्चला जगातील सर्वांत मोठा रास्ता रोको करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ३ मार्च रोजी संपूर्ण महाराष्ट्रात एकाच जिल्ह्यांत, एकाच ठिकाणी एकाच वेळी (दुपारी १२ ते १) मोठा रास्ता रोको करायचा आहे. आतापर्यंत अनेक मोठ्या सभा, रॅली आणि आंदोलने झाली. पण एवढा मोठा रास्ता रोको झाला नसेल, असंही मनोज जरांगे म्हणाले.


मनोज जरांगे

## अजय बारसकर यांची 'प्रहार'मधून हकालपट्टी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**मुंबई :** मनोज जरांगे-पाटील यांचे एकेकाळचे सहकारी आणि मराठा आरक्षण लढ्यातील त्यांचे साथीदार अजय महाराज बारसकर यांनी जरांगेंवर अनेक गंभीर आरोप केले. जरांगे यांना कायद्याचे ज्ञान नाही. जरांगे हे रोज पलटी मारतात. सातत्याने भूमिका बदलतात आणि नेहमी खोटे बोलतात, असा आरोप बारसकर यांनी बुधवारी मुंबईत पत्रकार परिषदेत केला. शिशुपालाप्रमाणे जरांगेंचेही १०० अपराध आता भरले आहेत, असंही बारसकर म्हणाले. जरांगे यांनी २३ डिसेंबर रोजी गुप्त बैठक कन्हैया हॉटेलमध्ये घेतली. त्या बैठकीचा मी साक्षीदार आहे. तिथे जरांगे बैठकीत एक बोलले आणि बाहेर माध्यमांसमोर दुसरेच बोलले. मी योग्यवेळी ते जाहीर करेन, असेही बारसकर यांनी सांगितले. मुंबईला मोर्चा निघाला असताना रांजणगाव गणपती येथे पहाटे चार वाजता जरांगे यांची एका उच्चपदस्थ अधिकाऱ्यांबरोबर बैठक झाली. या अधिकाऱ्याने या बैठकीचे रेकॉर्डिंग केले आहे. ते लवकरच निवृत्त होतील आणि जरांगेंचे बिंग फुटेल, असा गौप्यस्फोटही त्यांनी केला.
बारसकर यांच्या या भूमिकेनंतर त्यांची प्रहार जनशक्ती पक्षामधून हकालपट्टी करण्यात आली आहे. बारसकर हे बच्चू कडू यांच्या प्रहार संघटनेचे पदाधिकारी होते. प्रहार पत्रक काढत म्हणाले की, सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सुचित करण्यात येते की, प्रहार जनशक्ती पक्षाचे संस्थापक बच्चू कडू यांचा आदेश आहे की, पक्षामध्ये कोणीही मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात सुरु असलेल्या मराठा आरक्षणाविषयी किंवा इतर आरक्षण किंवा नेत्यांबद्दल कोणतीही भूमीका मांडू नये. असे केल्यास त्या व्यक्तीचा प्रहार जनशक्ती पक्षाशी काहीही संबध राहणार नाही.
पक्षाची अधिकृत भुमिका पक्षाचे संस्थापक अध्यक्ष बच्चू कडू हेच स्वतः मांडतील. इतर कोणीही अध्यक्षांच्या मान्यतेशिवाय आपली भूमिका मांडू नये. आज दि. २१/०२/२०२४ रोजी अजय महाराज बारस्कर यांनी जी भूमिका मनोज जरांगे पाटील यांचेविषयी मांडली त्या संदर्भात प्रहार जनशक्ती पक्ष किंवा प्रहार वारकरी संघटना समर्थन करत नाही किंवा काहीही संबध नाही. तरी अजय महाराज बारस्कर यांना प्रहार जनशक्ती पक्ष व प्रहार वारकरी संघटनेमधून बडतर्फ करण्यात येत आहे. त्यांचा पक्षाशी आजपासून काहीही संबध राहणार नाही, असं या पत्रकात म्हटलं आहे.

## ३०० कोटींचे एमडी ड्रग्ज प्रकरणी संशयित आयुब मकानदारसह तिघांना अटक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**सांगली :** पुणे शहर गुन्हे अन्वेषणने मंगळवारी सुमारे २ हजार कोटींचे मेफेड्रोन (एमडी) जप्त केल्यानंतर रात्री उशिरा कुपवाडमधील स्वामी मळा येथे छापा टाकला. या छाप्यात १४० किलो एमडी जप्त केले. त्याची बाजारभावातील किंमत सुमारे ३०० कोटी रूपये आहे. पोलिसांनी मुख्य सुत्रधार आयुब अकबरशा मकानदार (वय ४०), साथीदार अक्षय चंद्रकांत तावडे (वय ३०, दोघे रा. बाळकृष्णनगर कुपवाड), जागा मालक रमजान हमीद मुजावर वय ५५ वर्ष राहणार नूर इस्लाम मज्जिद जवळ कुपवाड) या तिघांना अटक केली.
मुख्य संशयित आयुब मकानदार याला २०११ मध्ये केटामाईनचा साठा केल्याबद्दल अटक करण्यात आली होती. या गुन्ह्यात त्याला शिक्षा झाली होती. पुण्यातील येरवडा कारागृहात शिक्षा भोगताना त्याची एमडी ड्रग्जची तस्करी करणाऱ्यांशी ओळख झाली होती. गतवर्षी मकानदार हा कारागृहाबाहेर आला होता. त्यानंतर त्याने एमडी तस्करीत गुंतला होता. कुपवाडमधील स्वामी मळा येथे मुजावर याच्या जागेतील पत्र्याच्या खोलीत साठा करून ठेवला होता. साथीदार अक्षय तावडे याच्या मदतीने तो तस्करी करत होता. दरम्यान पुणे गुन्हे अन्वेषणने मंगळवारी शानोरी व कुरकुंभ येथे छापे टाकून सुमारे २ हजार कोटींचे एमडी जप्त केले होते. संशयितांची चौकशी केल्यानंतर कुपवाडमधील आयुब मकानदार याची माहिती मिळाली. त्यानुसार रात्रीच पुणे पोलिसांचे पथक दाखल झाले. सांगलीचे स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पथक व कुपवाड पोलिसांच्या मदतीने आयुबला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने स्वामी मळा येथील खोलीत साठा ठेवल्याची कबुली दिली. बुधवारी सकाळपासून सायंकाळपर्यंत कारवाई व चौकशी सुरू होती. कारवाईत १४० किलो एमडी जप्त केले. तिघांना अटक करण्यात आली. पुणे पोलिसांसह सांगलीचे गुन्हे अन्वेषणचे निरीक्षक सतीश शिंदे, कुपवाडचे सहायक निरीक्षक अविनाश पाटील यांच्या पथकाने कारवाई केली.३०० कोटींचे एमडी ड्रग्ज प्रकरणी संशयित

आयुब मकानदारसह तिघांना अटक
माणदेश एक्सप्रेस न्युज
सांगली : पुणे शहर गुन्हे अन्वेषणने मंगळवारी सुमारे २ हजार कोटींचे मेफेड्रोन (एमडी) जप्त केल्यानंतर रात्री उशिरा कुपवाडमधील स्वामी मळा येथे छापा टाकला. या छाप्यात १४० किलो एमडी जप्त केले. त्याची बाजारभावातील किंमत सुमारे ३०० कोटी रूपये आहे. पोलिसांनी मुख्य सुत्रधार आयुब अकबरशा मकानदार (वय ४०), साथीदार अक्षय चंद्रकांत तावडे (वय ३०, दोघे रा. बाळकृष्णनगर कुपवाड), जागा मालक रमजान हमीद मुजावर वय ५५ वर्ष राहणार नूर इस्लाम मज्जिद जवळ कुपवाड) या तिघांना अटक केली.
मुख्य संशयित आयुब मकानदार याला २०११ मध्ये केटामाईनचा साठा केल्याबद्दल अटक करण्यात आली होती. या गुन्ह्यात त्याला शिक्षा झाली होती. पुण्यातील येरवडा कारागृहात शिक्षा भोगताना त्याची एमडी ड्रग्जची तस्करी करणाऱ्यांशी ओळख झाली होती. गतवर्षी मकानदार हा कारागृहाबाहेर आला होता. त्यानंतर त्याने एमडी तस्करीत गुंतला होता. कुपवाडमधील स्वामी मळा येथे मुजावर याच्या जागेतील पत्र्याच्या खोलीत साठा करून ठेवला होता. साथीदार अक्षय तावडे याच्या मदतीने तो तस्करी करत होता. दरम्यान पुणे गुन्हे अन्वेषणने मंगळवारी शानोरी व कुरकुंभ येथे छापे टाकून सुमारे २ हजार कोटींचे एमडी जप्त केले होते. संशयितांची चौकशी केल्यानंतर कुपवाडमधील आयुब मकानदार याची माहिती मिळाली. त्यानुसार रात्रीच पुणे पोलिसांचे पथक दाखल झाले. सांगलीचे स्थानिक गुन्हे अन्वेषणचे पथक व कुपवाड पोलिसांच्या मदतीने आयुबला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने स्वामी मळा येथील खोलीत साठा ठेवल्याची कबुली दिली. बुधवारी सकाळपासून सायंकाळपर्यंत कारवाई व चौकशी सुरू होती. कारवाईत १४० किलो एमडी जप्त केले. तिघांना अटक करण्यात आली. पुणे पोलिसांसह सांगलीचे गुन्हे अन्वेषणचे निरीक्षक सतीश शिंदे, कुपवाडचे सहायक निरीक्षक अविनाश पाटील यांच्या पथकाने कारवाई केली.

# संपादकीय

## भाजपला बसलेला पहिला झटका

चंडीगड महापौर, उपमहापौर निवडीच्या मतपत्रिका थेट सुप्रीम कोर्टात सादर करण्यात आला. निवडणुकीच्या प्रकरणावरून भाजपला मोठा झटका बसला. निवडणूक अधिकाऱ्यांच्या खोटारडेपणावर कोर्टाने ताशेरे ओरडत, इतिहास निकाल देत भाजपला मोठा झटका दिला. निवडणूक अधिकारी खोटं बोलण्याचे ताशेरे अन आपचे तीन नगरसेवक फोडूनही भाजपच्या महापौर पदाचे स्वप्न भंग झाले.

चंदिगड महापौर निवडणूकीच्या मतपत्रिकेमध्ये गोंधळावर सुप्रीम कोर्टामध्ये निकाल दिला. याठिकाणी आप व काँग्रेसची एकूण २० मते असताना महापौर व उपमहापौर हा आप व काँग्रेसचा असताना देखील निवडणूक अधिकाऱ्याने मतपत्रिकेमध्ये खाडाखोड करत, तबल आठ मते बाद करत भाजपच्या मनोज सोलकरांना विजय घोषित केले होते. या निवडणूक प्रक्रिये बाबत आप आणि काँग्रेसने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले. निवड प्रक्रियेमध्ये निवडणूक अधिकाऱ्यांनी हस्तक्षेप केलेचे न्यायालयात सिद्ध झाले. सुप्रीम कोर्टाने आपचे उमेदवार कुलदीप कुमार यांना चंदिगडचे महापौर म्हणून घोषित केले.

चंदिगड महापालिकेच्या महापौर आणि उपमहापौर पदाची निवड झाली भाजपकडे एकूण १७ मते होती. त्यामुळे त्यामुळे २० मते असलेले आप व काँग्रेस महापौर पदाची निवडणूक जिंकणार हे स्पष्ट होतं. मात्र निवड प्रक्रिया सुरू झाली तेव्हा निवडणूक अधिकारी अनिल मसीहा यांनी मतपत्रिकेमध्ये खाडाखोड केल्याने भाजपचा महापौर झाला. मात्र निवडणुका अधिकाऱ्यांना आप आणि काँग्रेसच्या मतपत्रांवरती खाडाखोड केल्याचा आरोप करत प्रकरण न्यायालयात गेले. निवडणूक अधिकारी मतपत्रांवरती काहीतरी लिहिताना व्हिडिओ समोर आला तेव्हा हे प्रकरण अजून ताणले गेले. आपने सुप्रीम कोर्टात धाव घेतली, सुप्रीम कोर्टाने निवड प्रक्रियेवर तीव्र संताप व्यक्त करत, अधिकाऱ्यांवर खटला चालवण्याचे आदेश देत अधिकाऱ्याला काही प्रश्न केले. यामध्ये पहिला प्रश्न केला की, आम्ही व्हिडिओ पाहिलाय तुम्ही मतपत्रिकांवर चिन्ह का करत होतात, यावर अधिकाऱ्याने उत्तर दिले की, मतदानानंतर मतपत्रिका वेगळ्या करायच्या होत्या. न्यायमूर्ती म्हणाले, व्हिडिओमध्ये स्पष्ट दिसते की तुम्ही मतपत्रिकांवर चिन्ह केलय हे खरं आहे का निवडणूक अधिकारी म्हणाले हो हे खरे आहे. तुमचे लक्ष जेव्हा कॅमेरा कडे गेलं तेव्हा तुम्ही इतके भांबावुन का गेला. समोरचे लोक कॅमेरा कॅमेरा म्हणून ओरडत होते म्हणून मी तसं बघितलं असे उत्तर या अधिकाऱ्याने दिले. त्यामुळे न्यायालयाने निर्देश दिले की, या निवडणूक अधिकाऱ्यांवर खटला चालवावा.

तर दुसरीकडे भाजपच्या महापौर व उपमहापौर यांनी राजीनामे दिले होते. तर आणखी विशेष म्हणजे, आपच्या तीन नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश केला होता. सुनवणी अगोदरछ भाजपच्या महापौर आणि उपमहापौरान राजीनामे देऊन टाकले व आपच्या फुटलेल्या नगरसेवकांच्या मदतीने पुन्हा आपलीच सत्ता येणार या भ्रमात भाजप राहिला. परंतु न्यायालयाने मात्र सर्व मतपत्रिका मागवून घेत, तपासणी केली असता यामध्ये आप व काँग्रेसच्या उमेदवाराला २० मते मिळाली असल्याचे निष्पन झाले. त्यामुळे न्यायालयाने निकाल देत अपच्या उमेदवारला विजयी घोषित केल्याने, भाजपच्या मोठी चपराक मिळाली असून, बहुदा या भाजपच्या नीतीची व पराभवाची नांदीच म्हणावी लागेल.

# नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. चौधरी निलंबित

## राज्यपालांकडून कारवाई, जाणून घ्या सविस्तर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नागपूर :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुभाष चौधरी यांना राज्यपाल रमेश बैस यांनी पदावरून निलंबित केले आहे. कुलगुरू डॉ. चौधरी यांच्याविरोधात राज्यपाल कार्यालयाकडे अनेक तक्रारी होत्या. राज्यपालांनी या तक्रारींवर बाजू मांडण्यासाठी बुधवार २१ फेब्रुवारीला कुलगुरूंना बोलावले होते. मात्र, डॉ. चौधरींच्या उत्तराने राज्यपाल कार्यालयाचे समाधान न झाल्याने त्यांनी निलंबनाची कारवाई केल्याची माहिती आहे.


डॉ. सुभाष चौधरी

कुलगुरू पदाचा प्रभार गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. सार्वजनिक विद्यापीठ कायद्यानुसार कुलगुरूंवर कारवाईचा अधिकार राज्यपाल व विद्यापीठाचे कुलपती यांना आहे. डॉ. सुभाष चौधरी यांच्या विरोधातील तक्रारींच्या चौकशीसाठी नेमण्यात आलेल्या उच्च तंत्र शिक्षण विभागाचे उपसचिव अजित बाविस्कर यांच्या समितीने आपला अहवाल राज्यपालांना दिला होता. या अहवालात कुलगुरूंकडून अधिकारांचा दुरुपयोग झाल्याचे, शासनाचे 'एमकेसीएल'संदर्भात आदेश असताना त्याची अवहेलना करण्यात आल्याचे ताशेरे ओढण्यात आले होते. परीक्षेच्या कामात महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादितची (एमकेसीएल) निवड आणि विनानिविदा बांधकामांचे कंत्राट देण्यात आल्याचे निष्कर्ष या अहवालात नोंदवण्यात आले होते. 'एमकेसीएल'सोबत विद्यापीठाने केलेला करार २०१५ मध्ये रद्द करण्यात आला होता. सप्टेंबर २०१७ मध्ये राज्य शासनाने विद्यापीठाला पत्र पाठवून 'एमकेसीएल'ला कोणतेही काम थेट देऊ नये असे पत्र दिले होते. असे असतानाही विद्यापीठाने शासन निर्णय डावलत 'एमकेसीएल'ला कंत्राट दिल्याचा ठपका या अहवालात ठेवण्यात आला होता. विशेष म्हणजे, डॉ. चौधरी यांच्या आग्रहामुळे 'एमकेसीएल'कडे परीक्षेचे काम देण्यात आले होते. माजी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी कुलगुरू चौधरी यांच्यावर कुठलीही कारवाई केली नव्हती. त्यामुळे राज्यपाल बैस यांनी अहवाल नव्याने सादर करण्याचे आदेश दिले होते. या अहवालानंतर राज्यपालांनी कुलगुरूंवर कारवाई केली आहे

## युवा शेतकऱ्याचा मृत्यू ; आंदोलन चिघळले

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** शेतीमालाला किमान आधारभूत किंमत देण्याचा कायदा करावा, यासाठी शेतकर्यांचे आंदोलन तीव्र होत चालले आहे. राजधानी दिल्लीकडे कूच करत असलेल्या शेतकर्यांना शंभू सीमेवर रोखण्यासाठी पोलिसांकडून बुधवारी अश्रुधुरासह रबरी गोळ्या आणि पाण्याच्या फवार्यांचा वापर करण्यात आला. या धुमश्चक्रीत एका युवा शेतकर्याचा मृत्यू झाला. शेतकरी नेते जगजित डल्लेवाल यांची प्रकृती खालावली आहे. दरम्यान, हे आंदोलन चिघळत चालल्याच्या पार्श्वभूमीवर, केंद्र सरकारने पुन्हा एकदा शेतकरी नेत्यांना चर्चेचे निमंत्रण दिले आहे.

शेतीमालाला किमान आधारभूत किंमत देण्याचा कायदा करावा यासह शेतकर्यांची सर्व कर्जे माफ करावीत, या आपल्या प्रमुख मागण्यांसाठी प्रामुख्याने पंजाब, हरियाणा आणि उत्तर प्रदेशातील शेतकरी आक्रमक झाले आहेत. त्यांच्या आंदोलनाचा बुधवारी नववा दिवस होता. पंजाबमधील सुमारे १४ हजार शेतकरी शंभू सीमेवरून १,२०० ट्रॅक्टर-ट्रॉलींमधून हळूहळू दिल्ली सीमेकडे निघाले आहेत. खनौरी सीमेवरूनही शेतकरी हरियाणात प्रवेश करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांना रोखण्यासाठी शंभू सीमेच्या परिसरात विविध ठिकाणच्या रस्त्यांवर खिळे ठोकण्यात आले आहेत. मात्र, शेतकरी या उपायांना दाद द्यायला तयार नाहीत. या शेतकर्यांसोबत सुमारे ८०० ट्रॅक्टर आहेत. शेतकर्यांना रोखण्यासाठी पोलिसांनी ड्रोनमधून दोनवेळा अश्रुधुराच्या नळकांड्या फोडल्या. अश्रुधुरापासून बचाव करण्यासाठी शेतकर्यांना खास मास्क, ओल्या सॅक आणि विशेष प्रकारचे गॉगल पुरवण्यात आले आहेत. शेतकर्यांच्या आंदोलनामुळे गुरुग्राम-दिल्ली सीमा बराच काळ ठप्प आहे. दिल्ली पोलिसांनी तेथे नाकाबंदी केली आहे.

हरियाणात शेतातून अचानकपणे आंदोलनासाठी येणार्या शेतकर्यांच्या भीतीमुळे तेथील पोलिस घोड्यावर स्वार होऊन रेकी करत आहेत. त्याचबरोबर पोलिसांनी वज्र वाहने आणि सुमारे १०० अग्निशमन दलाच्या गाड्या सज्ज ठेवल्या आहेत. शेतकर्यांचे आंदोलन तीव्र होत चालले असल्यामुळे केंद्र सरकारने त्याची गंभीर दखल घेतली आहे. या पार्श्वभूमीवर, केंद्रीय कृषिमंत्री अर्जुन मुंडा यांनी शेतकर्यांना पुन्हा चर्चेसाठी निमंत्रित केले आहे. विशेष म्हणजे, याआधीच्या चार बैठकाही निष्फळ ठरल्या आहेत. सरकारने चौथ्या बैठकीत ठेवलेला प्रस्ताव शेतकर्यांनी यापूर्वीच फेटाळून लावला आहे. त्यामुळे आता सरकार एखादा नवा प्रस्ताव ठेवणार काय, याकडे शेतकऱ्याचे लक्ष लागले आहे.

## मराठा समाजाला आर्थिकदृष्ट्या मागास म्हणता येणार नाही- उच्च न्यायालय

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** मराठा आरक्षणासाठीचा कायदा हा सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागासलेपणाच्या आधारे करण्यात आला होता. याउलट, कौटुंबिक उत्पन्न आणि इतर आर्थिक मागासलेपणाच्या आधारे आर्थिकदृष्ट्या मागासवर्गासाठी (ईडब्ल्यूएस) दहा टक्के आरक्षणाचा कायदा करण्यात आला. परिणामी, दोन्ही कायद्यांत फरक असल्याने मराठा समाजाला आर्थिकदृष्ट्या मागास म्हणता येणार नाही, असा निर्वाळा उच्च न्यायालयाने दिला आहे. तसेच, मराठा आरक्षण रद्द करण्याच्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर ईएसडब्ल्यू प्रवर्गातून न्यायीक सेवेत नियुक्ती देण्याची मागणी करणाऱ्या चार मराठा समाजाच्या याचिकाकर्त्यांना दिलासा देताना नकार दिला. याचिकाकर्त्यांनी एसईबीसी कायद्यांतर्गत अर्ज केला होता. त्यामुळे,सर्वोच्च न्यायालयाने हा कायदा घटनाबाह्य ठरवल्याच्या आदेशानंतर याचिकाकर्त्यांना ईडब्ल्यूएस प्रवर्गातून न्यायीक सेवेत नियुक्ती नाकारण्याचा सरकारचा निर्णय योग्य होता, असेही न्यायमूर्ती अनिल चांदूरकर आणि न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या खंडपीठाने याचिकाकर्त्यांच्या याचिका फेटाळताना नमूद केले. कनिष्ठ विभागीय दिवाणी न्यायाधीश आणि प्रथमश्रेणी दंडाधिकारी म्हणून नियुक्ती नाकारण्याच्या राज्य सरकारच्या निर्णयाला याचिकाकर्त्यांनी आव्हान दिले होते. या पदांसाठी जाहिरात काढण्यात आली त्या तारखेला यचिकाकर्त्यांचे वय पात्रता वयापेक्षा जास्त होते व ते आर्थिकदृष्ट्या मागासवर्गातील आहेत या कारणास्तव त्यात सवलत मागू शकत नाही. त्यामुळे, या पदांसाठी त्यांचा विचार केला जाऊ शकत नाही, असे राज्य सरकारतर्फे याचिकाकर्त्यांना कळवण्यात आले होते. त्याविरोधात याचिकाकर्त्यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) उपरोक्त पदांसाठी १ फेब्रुवारी २०१९ रोजी जाहिरात प्रसिद्ध केली होती. वकिलांसाठी वयोमर्यादा तीन वर्षांच्या सरावासह ३५ वर्षे होती आणि कायद्याचे शिक्षण पूर्ण करून वकिली क्षेत्रात नुकताच प्रवेश केलेल्यांसाठी वयाची मर्यादा ही २५ वर्षे होती. त्याचप्रमाणे, नियमानुसार उमेदवार मागासवर्गीय असल्यास वयोमर्यादा आणखी पाच वर्षांनी शिथिल केली जाईल, असे जाहिरातीत म्हटले होते. दरम्यान, मराठा समाज मागास असल्याचे अधिसूचित करून राज्य सरकारने ३० नोव्हेंबर २०१८ रोजी मराठा समाजाला सरकारी नोकऱ्या आणि शिक्षणात १६ टक्के आरक्षण देणारा कायदा केला. उच्च न्यायालयाने सरकारचा हा निर्णय योग्य ठरवला. मात्र, आरक्षणाची टक्केवारी १३ टक्के करण्याची सूचना केली. सर्वोच्च न्यायालयात या निर्णयाला आव्हान देण्यात आले. सुरूवातीला या प्रकरणी अंतरिम आदेश देताना ९ सप्टेंबर २०२० नंतर सार्वजनिक सेवा आणि सरकारच्या अखत्यारित येणाऱ्या पदांसाठी आरक्षणाची अंमलबजावणी केली जाऊ नये. परंतु त्याआधीच्या नियुक्त्या संरक्षित असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले होते. त्यामुळे याचिकाकर्त्यांनी उपरोक्त पदांसाठीची परीक्षा दिली व ते पात्रही ठरले. पुढे, २१ मे २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयाने मराठा आरक्षण घटनाबाह्य ठरवून ते रद्द केले.







## जादुई आवाजाचा विनम्र निवेदक हरपला : एकनाथ शिंदे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** ज्येष्ठ रेडिओ निवेदक अमीन सयानी यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दु:ख व्यक्त करून, त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण केली आहे. शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात, अमीन सयानी यांच्या रसाळ शैलीतल्या निवेदनांमुळे श्रोते मंत्रमुग्ध होऊन जात. त्यांच्या जादुई आवाजाची भुरळ मागील काही पिढ्यांपासून अगदी आत्ताच्या


अमय सयानी

पिढीपर्यंत देखील टिकून आहे. अमीन सयानी हे त्यांच्या आवाजाने करोडो कुटुंबातले सदस्यच झाले होते. त्यांच्या जाण्याने रेडिओच्या चाहत्यांत विनम्र असा आपला माणूस हरपल्याची भावना आहे, असे नमूद करून मुख्यमंत्र्यांनी अमीन सयानी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.















दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक
mandeshexpressatp@gmail.com
दैनिक
माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस






## ठाणेत २४ ते २८ फेब्रुवारी दरम्यान होणार राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** छत्रपती शिवाजी महाराज चषक कबड्डी स्पर्धा राज्य शासनामार्फत आयोजित करण्यात येते. यावर्षी ही स्पर्धा ठाणे येथे २४ ते २८ फेब्रुवारी दरम्यान होणार आहे. ही राज्यस्तरीय स्पर्धा असून स्पर्धेसाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या खेळाडूंची उत्तम व्यवस्था करावी, असे निर्देश राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे याबाबत आढावा बैठकीचे आयोजन मंत्री श्री. देसाई यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. बैठकीस क्रीडा विभागाचे उपसंचालक नवनाथ फरतडे, जिल्हा क्रीडा अधिकारी श्रीमती सुवर्णा बारटक्के, कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते. या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांची बक्षीसांची



रक्कम वाढविण्यासाठी तातडीने क्रीडा विभागाने प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना देत मंत्री श्री. देसाई म्हणाले, या स्पर्धेत पुरूषांचे १६ व महिलांचे १६ असे एकूण ३२ संघ सहभागी होणार आहे. खेळाडूंची निवास, भोजन तसेच वाहतूकीची उत्तम व्यवस्था करावी. स्पर्धा ठिकाणी स्वच्छता, पार्किंग आदींची व्यवस्थाही असावी. महिला खेळाडूंच्या बाबत सुरक्षा, निवासाच्या व्यवस्थेचे विशेष लक्ष ठेवावे. ही स्पर्धा ठाणे (पश्चिम) भागातील ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या जवळील मैदानावर होणार आहे. स्पर्धेसाठी निधी वाढवून मिळण्याबाबत विभागाने प्रयत्न करण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या. बैठकीस कबड्डी असोसिएशनचे पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते.

## खानापूरात शिवाजी विद्यापीठ उपकेंद्र उभारण्याच्या हालचाली गतिमान

### जागेचा प्रस्ताव सादर करण्याचे मंत्री शंभुराज देसाई यांचे निर्देश

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई :** कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र खानापूर जि. सांगली येथे उभारण्यासाठी विद्यापीठ कार्यकारी समितीचा अहवाल सकारात्मक आहे. तसेच शासकीय जागाही उपलब्ध आहे. खानापूर येथे विद्यापीठाच्या उपकेंद्र उभारणीमुळे सातारा, सांगली या भागातील विद्यार्थ्यांची सोय होणार असून उपकेंद्राचा प्रस्ताव तातडीने सादर करावा, असे निर्देश उत्पादन शुल्क मंत्री शंभुराज देसाई यांनी दिले. सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित उपकेंद्र आढावा बैठकीत मंत्री श्री. देसाई बोलत होते. बैठकीस उच्च शिक्षण विभागाचे प्रधान सचिव



**मुंबई : सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित उपकेंद्र आढावा बैठक मंत्री शंभूराज देसाई यांच्या उपस्थित संपन्न झाली. बैठकीस उपस्थित सुहास बाबर, अमोल बाबर व अधिकारी**

विकासचंद्र रस्तोगी, सांगली जिल्हानियोजन समितीचे सदस्य सुहास बाबर, अमोल बाबर आदी उपस्थित होते. तर दुरदृश्य संवाद प्रणालीद्वारे विद्यापीठाचे प्र. कुलगुरू दिगंबर शिर्के, कुलसचिव व्ही. एन शिंदे, प्राचार्य व्ही. एम पाटील यांनी चर्चेत सहभाग घेतला. विद्यापीठाने खानापूर येथील उपकेंद्राचा सर्वसमावेशक प्रस्ताव पाठविण्याचे सांगत मंत्री श्री. देसाई म्हणाले, खानापूर येथे शासकीय गायरान जमिन उपलब्ध आहे. तसेच जलसंपदा विभागाची जमीनही आहे. आवश्यकता असल्यास जलसंपदा विभागाच्या जमिनीचाही उपयोग करता येईल. सांगली येथे तात्पुरते उपकेंद्र सुरू न करता खानापूर येथेच कायमस्वरूपी उपकेंद्र सुरू करावे. प्रस्ताव तातडीने सादर करून त्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची मान्यता घेण्यात येईल. तसेच उच्च शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याशीसुद्धा चर्चा करण्यात येईल, असेही मंत्री श्री. देसाई यांनी सांगितले.




## स्वेरीज् पॉलिटेक्निकमध्ये पालक मेळावा संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**पंढरपूर :** 'स्वेरीमधील आदरयुक्त शिस्तीमुळे विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार घडत असतात आणि विद्यार्थ्यांना अभ्यासाची सवय जडते. त्यामुळे आमच्या पाल्यानी स्वेरीतच शिक्षण घ्यावे असे आम्हा पालकांना असे वाटते. स्वेरीमध्ये शिक्षणाबरोबरच चांगले संस्कार घडवले जातात. त्यामुळे विद्यार्थी हा बाहेरील जगात स्पर्धा करण्यासाठी सज्ज होतो. एकूणच स्वेरीच्या माध्यमातून पालकांपर्यंत अखंड धागा जोडला गेलेला आहे. स्वेरीचे शिक्षक आणि पालक यांच्यातील संवादाचा विद्यार्थ्यांच्या करिअर वर परिणाम जाणवतो आणि विद्यार्थी उज्वल यश संपादन करतात.' असे प्रतिपादन पालक प्रतिनिधी सोमनाथ नागणे यांनी केले.



**पंढरपूर : डिप्लोमाच्या पालक मेळाव्यात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करताना पालक प्रतिनिधी सोमनाथ नागणे, किशोर हुके, प्रशांत जवळकर, महिला पालक प्रतिनिधी सौ. कल्पना हुके, सौ. वर्षा धर्माधिकारी, सोबत प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, प्राध्यापक वर्ग पालक मेळाव्यासाठी जमलेले पालक**

येथील श्री.विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिटयुट संचलित पॉलिटेक्निक इंजिनिअरिंगच्या कॉम्प्यूटर इंजिनिअरिंग व इन्फोर्मेशन टेक्नोलॉजी या विभागांच्या पालक मेळाव्यात सोमनाथ नागणे हे बोलत होते. यावेळी पालक प्रतिनिधी म्हणून किशोर हुके, पुण्यातील उद्योजक प्रशांत जवळकर तर महिला पालक प्रतिनिधी म्हणून सौ. कल्पना हुके व सौ. वर्षा धर्माधिकारी हे देखील उपस्थित होते. प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ यांनी पालकांचे स्वागत करून महाविद्यालयाची संपूर्ण माहिती दिली. कॉम्प्यूटर इंजिनिअरिंगचे विभागप्रमुख प्रा. पी.एस. भंडारे व इन्फोर्मेशन टेक्नोलॉजीचे विभागप्रमुख प्रा. जी.एस. मिसाळ यांनी आपल्या विभागांची सर्व माहिती दिली. गतवर्षीच्या परीक्षेत ९० टक्केहून अधिक गुण मिळविलेले ५५ गुणवंत विद्यार्थी तसेच झोनल स्पर्धेत प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा या वेळी पाहुण्यांकडून सत्कार करण्यात आला. यावेळी जवळपास २०० पालक, प्राध्यापक वर्ग आणि शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. स्नेहा माने, कीर्ती पाटील सृष्टी नारायण व स्नेहल जगताप यांनी सूत्रसंचालन केले तर रुही तेंडुलकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.









# आंदोलन बदनाम करण्याचा सरकारचा ट्रॅप

## मनोज जरांगेंचे बारसकरांच्या आरोपांना उत्तर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**जालना :** मनोज जरांगे पाटील यांच्या कुणबी प्रमाणपत्र मिळवण्यासाठीच्या लढ्यात सहकार्य करणारे किर्तनकार अजय बारसकर यांनी आता मनोज जरांगे पाटील यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत.


मनोज जरांगे

अजय बारसकर यांनी पत्रकार परिषद घेऊन मनोज जरांगे पाटील हे हेकेखोर वृत्तीचे असल्याचा आरोप केला. तसेच गेल्या दोन महिन्यांपासून त्यांनी बंद दाराआड काही बैठका घेतल्या आहेत आणि अद्याप या बैठका होत असल्याचा आरोपही बारसकर यांनी केला आहे. त्याचबरोबर जरांगे पाटील यांनी संत तुकाराम यांचा अवमान केला असल्याचा आरोप बारसकर यांनी केला. बारसकर यांच्या या आरोपांना आता मनोज जरांगे यांनी प्रत्युत्तर दिलं आहे.

मनोज जरांगे म्हणाले, तो (अजय बारसकर) कुठल्या नेत्याबरोबर फिरत होता, कोणत्या नेत्याच्या मागे मागे पळत होता, याचे सगळे रेकॉर्डिंग्स आमच्याकडे आहेत. आता मराठ्यांना आरक्षण मिळत आहे, तर ही गोष्ट काही लोकांच्या डोळ्यात खुपतेय. जगद्गुरू तुकाराम महाराजांबद्दल तोंडून जे शब्द निघाले त्याबद्दल मला अत्यंत वाईट वाटतं. मी त्यानंतर आत्मक्लेश केला. माफी मागितली, मी त्याबद्दल आताही तोंडात मारून घेतो. चुकून काहीतरी निघून गेलं असेल. परंतु, त्यानंतरही बारसकर हे सगळं बोलणारच आहे. त्याला तेच काम देण्यात आलं आहे. त्याला आपल्यावर टीका करण्याचा ठेका दिला आहे.

अजय बारसकरसारखे प्रवचनकार असतील तर जनता कशी सुधारेल? त्याला माझ्या हातून पाणी प्यायचं होतं, त्याला भोंदू बाबा व्हायचं होतं. दुसऱ्या बाजूला कुठल्या तरी प्रवक्त्याला मंत्री व्हायचं आहे. बारसकर आणि तो प्रवक्ता मिळून बदनामीचा डाव रचत आहेत. मी सर्व प्रसारमाध्यमांना विनंती करतो की तुम्ही आजपासून मला त्या बारसकरबद्दल काही प्रश्न विचारू नका. त्याला विनाकारण प्रसिद्धी दिली जात आहे. ज्याला समाजमाध्यमांवरही कोणी विचारत नाही, त्याला तुम्हा वृत्तवाहिन्यांच्या मुख्य कार्यालयांनी काही मिनिटात इतकं महत्त्व कसं काय दिलं? त्याची पत्रकार परिषद सर्व वृत्तवाहिन्यांनी लगेच लाईव्ह दाखवली (थेट प्रसारण केलं). याचा अर्थ त्याच्या पाठीमागे कोणीतरी आहे. यात सरकारचा मोठा ट्रॅप आहे.असा आरोप ही मनोज जरांगे यांनी केला.

# मनोज जरांगे तुझे १०० अपराध भरले

## किर्तनकार अजय बारसकर यांचे गंभीर आरोप

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**जालना :** मनोज जरांगे पाटील यांच्या कुणबी प्रमाणपत्र मिळविण्यासाठीच्या लढ्यात सहकार्य करणारे किर्तनकार अजय बारसकर यांनी आता मनोज जरांगे पाटील यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. आजवर ओबीसी नेते आणि राज्यातील काही मराठा नेते हे जरांगे पाटील यांच्या विरोधात भूमिका घेत होते. मात्र आता त्यांच्याच टीममधील एक व्यक्ती मनोज जरांगे पाटील यांच्या विरोधात गेल्याचे दिसत आहे. अजय बारसकर यांनी पत्रकार परिषद घेऊन मनोज जरांगे पाटील हेकेखोर असल्याचे आरोप केले. तसेच मागच्या दोन महिन्यापासून त्यांनी बंद दाराआड बैठका घेण्यास सुरुवात केल्याचाही आरोप बारसकर यांनी केला. तसेच जरांगे पाटील यांनी संत तुकाराम यांचा अवमान केला असल्याचाही आरोप बारसकर यांनी केला.

किर्तनकार अजय बारसकर पत्रकार परिषदेत म्हणाले की, मी मराठा समाजासाठी गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत आहे. मराठवाड्यात कुणबी शोधण्यासाठी मी अनेक वर्षांपासून प्रयत्न करत होतो. त्यामुळे मधल्या काळात मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाशी जोडलो गेलो. पण जरांगे पाटील यांच्यासह काम करताना त्यांची हेकेखोर वृत्ती हळूहळू समजू लागली. सरकारी अधिकाऱ्यांच्या बैठकांमध्ये मी जरांगे पाटील यांना मसूदा वाचून त्यातील बारकावे लक्षात आणून देण्याचे काम करत होतो. एकदा त्यांनी माझा महाराज असा जाहीर उल्लेखही केलेला आहे. पण त्यांचे खरे रुप समोर आल्यामुळे मी आता जनतेसमोर येऊन सत्य सांगण्याचा प्रयत्न करत आहे.


अजय बारसकर


मूळचे किर्तनकार असलेल्या बारसकर यांनी अभंग आणि पुराणातील उदाहरणे देऊन आपला मुद्दा स्पष्ट केला. शिशूपालाचे १०० अपराध भरले, हे भगवान श्रीकृष्णाने म्हटले होते. त्याप्रमाणे या जरांगेचेही १०० अपराध आता भरले आहेत. मध्यंतरी जरांगे पाटील यांचे उपोषण सोडविण्यासाठी मी आंतरवाली सराटी येथे गेलो होतो. मी त्यांना माझ्या हाताने पाणी पाजण्याचा प्रयत्न केला. मी देहूवरून आलो असल्याचे सांगण्याचा प्रयत्न करत असताना जरांगे पाटील यांनी संताचा अवमान करणारे विधान केले. त्यामुळे मी दुःखी झालो. मला हे सहन झाले नाही, त्यामुळेच आता मी जरांगेंची पोलखोल करत आहे, असेही बारसकर यांनी सांगितले. बारसकर पुढे म्हणाले की, जर मी बसमधून प्रवास करत असेल आणि मला जर कळलं की बसचा चालक मद्य प्यायलेला आहे. तर सर्वात आधी मी बसमधून उतरेल आणि इतर प्रवाशांनीही बसमधून उतरावे, अशी बोंब ठोकेल. आज मराठा समाजाच्या आंदोलनाचा नेतृत्व करणारा व्यक्ती असाच नशेत आहे, हे मला आवर्जून सर्वांना सांगायचे आहे, अशी टीका बारसकर यांनी केली. मनोज जरांगे हे अहंकारी आहेतच, पण त्यांच्या मुलांमध्येही हा अहंकार भरून राहिला आहे. एका वृत्तवाहिनीशी बोलताना जरांगेंच्या मुलीने म्हटले की, 'माझ्या वडिलांनी देवालाही झुकायला भाग पाडले'. त्या लहान मुलीने उच्चारलेले हे वाक्य जरांगेंच्या अहंकाराच्या शिकवणुकीतून आले, असाही आरोप अजय बारसकर यांनी केला. मनोज जरांगे पाटील यांच्यावर आरोप केल्यापासून माझ्यावर फुटीरतेचे आरोप लावले जात आहेत. मी सरकार आणि छगन भुजबळ यांचा एजंट आहे, असे सांगितले जात आहे. पण मी भाजपा पक्ष आणि छगन भुजबळ यांच्यावर जहाल टीका केली आहे. छगन भुजबळ माझे मित्र नाहीत. माझा आणि त्यांचा काहीही संबंध नाही, असेही बारसकर यांनी जाहीर केले.

# प्रा. गौतमीपुत्र कांबळे यांचा अमृतमहोत्सवी वाढदिवशी होणार सन्मान

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** फुले, शाहू, आंबेडकरी चळवळीतील विचारवंत, साहित्यिक प्रा. गौतमीपुत्र कांबळे यांचा ७५ व्या वाढदिवसानिमित्त त्यांनी शैक्षणिक, वैचारिक, साहित्यिक, सामाजिक, कर्मचारी चळवळीमधे दिलेले योगदान आणि दलित पँथर, मास मुव्हमेंट, प्रशिक विद्यार्थी संघटना, फास्टा, सेक्युलर एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, सेक्युलर मुव्हमेंट, सेक्युलर आर्ट मुव्हमेंट या विविध संस्था-संघटनांच्या माध्यमातून केलेल्या कार्याच्या गौरवार्थ रविवार, २५ फेब्रुवारी रोजी सांगलीत सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

जागतिक भाषातज्ञ, पद्मश्री डॉ. गणेश देवी यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे. या सोहळ्यास आमदार अरुण लाड, ज्येष्ठ साहित्यिक विचारवंत लक्ष्मीकांत देशमुख, प्रदीप दुसाद, पुणे, नवभारत शिक्षण संस्थेचे संचालक गौतम पाटील, उद्योजक अ‍ॅड. सी. आर. सांगलीकर, यांची प्रमुख उपस्थिती असुन वक्ते म्हणून साहित्यिक डॉ. राजन गवस, फुले-शाहू-आंबेडकर टिचर्स असोसिएशन, (फास्टा) कोल्हापूरचे अध्यक्ष प्रा. डॉ. भरत नाईक, मुंबई माजी पोलीस उपायुक्त आणि सेक्युलर मुव्हमेंटचे महाराष्ट्र संघटक भरत शेळके, सेक्युलर मुव्हमेंट सांगली जिल्हा अध्यक्ष प्रा कैलास काळे आणि नाशिकहून ज्येष्ठ कार्यकर्ते करुणासागर पगारे हे वक्ते आपले मनोगत व्यक्त करतील.


प्रा. गौतमीपुत्र कांबळे

या निमित्ताने सकाळी १०.३० वाजता मा. कुलगुरू डॉ डी. टी. शिर्के, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे हस्ते डॉ बाबासाहेब आंबेडकर आणि महाराष्ट्रातील मान्यवर अभ्यासकांच्या लेखांचा संपादित संग्रह, मानवमुक्तीचा पथदर्शक आणि महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील सहकार्यांनी प्रा गौतमीपुत्र कांबळे यांच्या घेतलेल्या प्रदीर्घ मुलाखतीवर आधारित संवाद मानवमुक्तीच्या प्रवाहाशी या दोन पुस्तकांचे प्रकाशन होत आहे. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून लेखक समिक्षक प्रा. अविनाश सप्रे, प्रा.डॉ. रणधीर शिंदे, सतीश बनसोडे आणि अलोक जत्राटकर यांची उपस्थिती आहे. सकाळी ११.३० ते ०१.३० दुसर्या सत्रात सांस्कृतिक युध्द/लढा समजून घेताना. या विषयावर पद्मश्री डॉ. गणेश देवी यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद आयोजित केला आहे. यामधे महाराष्ट्र श्रमिक मुक्ती दल अध्यक्ष डॉ भारत पाटणकर, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर मधील राज्यशास्त्राचे प्रा डॉ. प्रकाश पवार, महाराष्ट्र विद्रोही सांस्कृतिक चळवळीचे कार्याध्यक्ष धनाजी गुरव, मुंबईस्थित ज्येष्ठ पत्रकार मधु कांबळे, क्युरेटर तथा दृश्यकलावंत प्रभाकर कांबळे, मुंबई हे विविध क्षेत्रातील विवेकवादी कार्यकर्ते - अभ्यासक वक्ते म्हणून सहभागी होत आहेत. संपूर्ण सन्मान सोहळ्याचे आयोजन प्रा गौतमीपुत्र कांबळे सन्मान समिती आणि नवभारत शिक्षण संस्था संचालित शांतिनिकेतन लोकविद्यापीठ मार्फत लोकरंगभुमी, शांतिनिकेतन लोकविद्यापीठ, वसंतदादा कारखान्यासमोर, माधवनगर रोड येथे संपन्न होत आहे.

# अवघ्या ८ व्या कसोटीत जैस्वाल मोडणार कोहलीचा विक्रम

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

**नवी दिल्ली :** यशस्वी जैस्वालची बॅट तळपत आहे. त्याने आपल्या शानदार फलंदाजीने सर्वांचेच लक्षवेधून घेतले आहे. या युवा फलंदाजाने इंग्लंडविरुद्ध आपल्या स्फोटक कामगिरीने सर्वांनाच आश्चर्यचकीत केले आहे. रोहित शर्माची आक्रमकता त्याच्या फलंदाजीत दिसत असतानाच तो विराट कोहलीसारखा तंत्रशुद्ध शॉट्स मारण्यातही माहीर आहे. त्याने आयपीएल २०२३ मध्ये राजस्थान रॉयल्ससाठी चमकदार कामगिरी केली आणि त्यानंतर टीम इंडियामध्ये स्थान मिळवले. त्याच्या उत्कृष्ट फलंदाजीमुळे तो टीम इंडियाच्या बॅटिंग ऑर्डरमधील महत्त्वाचा दुवा बनला आहे. अशातच तो आता इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत तो कोहलीचा मोठा विक्रम मोडू शकतो.

विराट कोहलीने २०११ मध्ये टीम इंडियाकडून कसोटी पदार्पण केले. त्याने आपल्या कसोटी कारकिर्दीत केवळ २६ षटकार मारले आहेत. दुसरीकडे, २२ वर्षीय यशस्वी जैस्वालने भारतीय संघासाठी आतापर्यंत ७ कसोटी सामन्यांच्या १३ डावांमध्ये २५ षटकार ठोकले आहेत. यशस्वी ज्या फॉर्ममध्ये आहे, ते पाहता तो कोहलीचा विक्रम सहज मोडू शकतो. कोहलीचा विक्रम मोडण्यासाठी जयस्वालला फक्त दोन षटकारांची गरज आहे.

जैस्वालने २०२३ साली वेस्ट इंडिजविरुद्ध भारतीय संघात पदार्पण केले. पदार्पणाच्या


यशस्वी जैस्वाल

सामन्यातच त्याने शतक झळकावले. यानंतर त्याने इंग्लंडविरुद्धच्या दुसऱ्या आणि तिसऱ्या कसोटी सामन्यात दमदार फलंदाजीचा नमुना सादर करत सलग दोन द्विशतके फटकावली. कसोटी क्रिकेटमध्ये अशी कामगिरी करणारा तो केवळ तिसरा भारतीय खेळाडू ठरला आहे. त्याने दुसऱ्या कसोटी सामन्यात २०९ आणि तिसऱ्या कसोटीत २१४ धावांची खेळी केली.

जैस्वालने इंग्लंडविरुद्धच्या तिसऱ्या कसोटीत द्विशतक झळकावताना आपल्या डावात १२ षटकार ठोकले. कसोटी सामन्याच्या एका डावात इतके षटकार मारण्याच्या बाबतीत तो संयुक्तपणे पहिल्या क्रमांकावर पोहचला आहे. त्याच्या आधी वसीम अक्रमनेही एका कसोटी डावात १२ षटकार ठोकले होते. यशस्वीने टीम इंडियासाठी आतापर्यंत ७ कसोटी सामन्यांमध्ये ८६१ धावा केल्या आहेत, ज्यात तीन शतकांचा समावेश आहे. याशिवाय त्याने भारतीय संघासाठी १७ टी-२० सामन्यांमध्ये ५०२ धावा केल्या आहेत.

# महाराष्ट्र भूषण' पुरस्काराचे आज वितरण

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाकडून दिला जाणारा राज्याचा सर्वोच्च नागरी सन्मान असणारा 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार, येत्या गुरूवारी, दि. २२ फेब्रुवारी रोजी ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. तर मानाचा गानसम्राज्ञी लता मंगेशकर पुरस्कार ज्येष्ठ पार्श्वगायक सुरेश वाडकर यांना प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय, मराठी व हिंदी चित्रपटसृष्टीसाठी आपल्या कलेच्या माध्यमातून अनेक वर्ष योगदान देत रसिकांची व कलासृष्टीची सेवा करणाऱ्या ज्येष्ठ कलावंतांना दिला जाणारा राजकपूर जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कार, चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव आणि विशेष योगदान पुरस्कारही यावेळी प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी दिली.




वरळी येथील डोम, एनएससीआय ( नॅशनल स्पोर्टस क्लब ऑफ इंडिया) येथे गुरुवारी सायंकाळी ६.३० वाजता होणाऱ्या ५७ व्या राज्य चित्रपट पुरस्कार सोहळ्यात हे पुरस्कार मुख्यमंत्री श्री. शिंदे यांच्या हस्ते सन्मानपूर्वक प्रदान करण्यात करण्यात येतील. या समारंभास केंद्रीय वाणिज्य मंत्री पीयूष गोयल, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. तर, विधानसभा अध्यक्ष ड. राहुल नार्वेकर, विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, शालेय शिक्षण मंत्री तथा मुंबई शहर पालकमंत्री दीपक केसरकर, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता मंत्री तथा मुंबई शहर उपनगर पालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या कार्यक्रमास स्थानिक लोकप्रतिनिधीही उपस्थित राहणार आहेत.

ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांना २०२३ साठीचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. राजकपूर जीवनगौरव पुरस्कार सन २०२० साठी ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती अरुणा इराणी, सन २०२१ साठी ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती आणि सन २०२२ साठी ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती हेलन यांना जाहीर झाला आहे तर राजकपूर विशेष योगदान पुरस्कार सन २०२० साठी ज्येष्ठ दिग्दर्शक जे. पी. दत्ता, सन २०२१ साठी ख्यातनाम गायक सोनू निगम आणि सन २०२२ साठी विधू विनोद चोप्रा यांना जाहीर झाला आहे. या समारंभात त्यांना सन्मानपूर्वक हे पुरस्कार प्रदान केले जातील.

ज्येष्ठ कलावंतांना दिला जाणारा चित्रपती व्ही. शांताराम जीवनगौरव पुरस्कार सन २०२० साठी ख्यातनाम चित्रपट अभिनेते स्व. रविंद्र महाजनी (मरणोत्तर), सन २०२१ साठी ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती उषा चव्हाण आणि सन २०२२ साठी ज्येष्ठ अभिनेत्री श्रीमती उषा नाईक यांना जाहीर झाला आहे. यासोबतच चित्रपती व्ही. शांताराम विशेष योगदान पुरस्कार सन २०२० साठी चित्रपट दिग्दर्शक गजेंद्र अहिरे, सन २०२१ साठी ज्येष्ठ पार्श्वगायक रवींद्र साठे आणि सन २०२२ साठी प्रसिद्ध चित्रपट अभिनेते-दिग्दर्शक नागराज मंजुळे यांना जाहीर झाला आहे. या राज्य चित्रपट पुरस्कार सोहळ्याच्या समारंभात हे पुरस्कार प्रदान केले जाणार आहेत.

या पुरस्कार सोहळ्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव तथा सांस्कृतिक कार्य विभागाचे प्रधान सचिव विकास खारगे, महाराष्ट्र राज्य चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक डॉ.अविनाश ढाकणे आणि सांस्कृतिक कार्य संचालक बिभीषण चवरे यांनी केले आहे.

